# "डिजिटल युगात सायबर सुरक्षेचे ज्ञान प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचणे ही काळाची गरज : प्रियदर्शनी भांडारकर

नंदिनीबाई गर्ल्स स्कूलमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती मार्गदर्शन सत्र उत्साहात संपन्न

July 23, 2026 4:48 pm 0


1 minute read




## ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडिया सुरक्षितता आणि डिजिटल गोपनीयतेबाबत 250 विद्यार्थिनींना मार्गदर्शन

*। लोकमाध्यम न्युज । जळगाव (प्रतिनिधी) दि. 23 : विद्यार्थिनींमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने नंदिनीबाई गर्ल्स स्कूल येथे इयत्ता 8 वी ते 10 वीच्या विद्यार्थिनींसाठी सायबर सुरक्षा जनजागृती विषयावर विशेष मार्गदर्शन व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. दि. 22 जुलै रोजी दुपारी 3 ते 4 या वेळेत झालेल्या या सत्राला सुमारे 250 विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.*

### सायबर गुन्ह्यांपासून बचावाचे दिले मार्गदर्शन



या सत्रात प्रियदर्शनी भांडारकर आणि खुशबू लांबोळे यांनी ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, विशिंग, स्मिशिंग, ओटीपी आणि पासवर्ड सुरक्षितता, मजबूत पासवर्ड तयार करण्याचे महत्त्व, द्विस्तरीय प्रमाणीकरण (2-Factor Authentication), सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, बनावट लिंक व क्यूआर कोड स्कॅम, सायबर बुलिंग, डिजिटल गोपनीयता, अज्ञात व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क टाळणे तसेच मोबाईल अॅप्स डाउनलोड करताना घ्यावयाची खबरदारी यासह सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी आवश्यक उपायांची सविस्तर माहिती दिली.

**संवादातून वाढली जागरूकता –** संवादात्मक पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्रात विद्यार्थिनींनी विविध प्रश्न विचारत सायबर सुरक्षेबाबतच्या शंकांचे निरसन करून घेतले. तसेच सुरक्षित डिजिटल जीवनशैलीचा अवलंब करण्याचा संकल्पही विद्यार्थिनींनी यावेळी केला.

**शाळेचे सहकार्य –** या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. एस. एम. राणे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



**"डिजिटल युगात सायबर सुरक्षेचे ज्ञान प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे. योग्य माहिती आणि सतर्कतेमुळे अनेक सायबर गुन्हे टाळता येऊ शकतात."**

**— प्रियदर्शनी मनोज भांडारकर, मार्गदर्शक**